RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(३)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ४६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम **११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XXXIV OF 2025.**

A BILL

TO AMEND THE VIDARBHA IRRIGATION DEVELOPMENT BOARD ACT, 1997.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४.**

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** विदर्भ विभागाच्या सिंचन क्षेत्रातील फार मोठ्या प्रमाणावरील अनुशेष विचारात घेता विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ यात आणखी सुधारणा करणे आवश्यक आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे.

**१.** (१) या अधिनियमास विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** विदर्भ पाटबंधारे विकास अधिनियम, १९९७ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) त्याच्या कलम २ मध्ये पोट-कलम (जे) नंतर पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील–

(के) "सत्यशोधन समिती" म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाच्या ३ ऑगस्ट १९८३ च्या शासन निर्णयाने (क्रमांक आरडीव्ही-१०८२/सीआर-३८/पीआरजी-१४) नेमलेली समिती.

(एल) सत्यशोधन समितीचा अहवाल म्हणजे सत्यशोधन समितीने सादर केलेला व महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने एप्रिल, १९८४ मध्ये महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल या मथळ्याखाली प्रसिद्ध केलेला अहवाल.

(एम) अनुशेष म्हणजे जिल्हा घटक धरून प्रमाण रब्बी समन्यमश्रा निश्चत झालेल्या राज्य सरासरीवर जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये प्रत्येक जिल्ह्याचे मोलण्यात आलेले व सत्यशोधन समितीच्या अहवालाच्या तक्ता ७.५ च्या स्तंभ क्रमांक ७ मध्ये हेक्टरात नमूद असलेले मागासलेपण किंवा जिल्हा घटक धरून प्रमाण रब्बी समतुल्यमध्य सत्यशोधन समितीच्या दर्शकानुसार व त्या समितीने ठरवून दिलेल्या सुत्राप्रमाणे व पद्धती अद्यावत माहितीने उपलब्ध असलेल्या अलीकडील वर्षाच्या महाराष्ट्राच्या राज्य सरासरीवर जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये निश्चित झालेले व हेक्टरात नमूद असलेले मागासलेपण.

(एन) " बहुअनुशेष जिल्हा" म्हणजे " ४० हजार हेक्टरांपेक्षा जास्त अनुशेष असलेला जिल्हा ".

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मधील पोट-कलम (ड) मध्ये, मुख्य अभियंता (गोसी खुर्द), पाटबंधारे विभाग" या मजकुराऐवजी " मुख्य अभियंता ", ऊर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग, अमरावती हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ यामध्ये कलम १८-अ व १८-ब समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ नंतर पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :–

"१८-अ. या अधिनियमान्वये सोपविलेली कामे पार पाडताना महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील बहु अनुशेष जिल्ह्यांना अनुशेष संपुष्टात आणण्याच्या दृष्टीने कामांना चालना देणे हे महामंडळाचे प्रधान कार्य असेल.

१८-ब. खंड १८-अ मध्ये नमूद केलेल्या कार्याच्या पूर्तीसाठी व अनुशेष जिल्ह्यांना अनुशेषाच्या प्रमाणात तुलनेने जास्त नियतव्यय उपलब्ध होईल याची खबरदारी खंड १८ च्या पोट-कलम (ल) नुसार दिलेल्या अधिकारांचा वापर करून वार्षिक अर्थसंकल्प तयार करताना महामंडळ घेईल".

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या शिर्षकामध्ये.

**५.** मुख्य अधिनियमाच्या शिर्षकामध्ये, " ते प्रकल्प कार्यान्वित करण्यास" या मजकुराऐवजी "ते प्रकल्प कार्यान्वित करण्यास तसेच विदर्भातील जलसिंचन या विकास क्षेत्रात अनुशेष असलेल्या जिल्ह्यांचा अनुशेष संपुष्टात आणण्याच्या प्रयोजनार्थ" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन ११९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या हेतुवाक्यामध्ये सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या हेतूवाक्यामध्ये "या नद्यांचे पाणी उपयोगात आणण्यासाठी" या मजकुरानंतर "तसेच विदर्भातील जलसिंचन या विकास क्षेत्रात अनुशेष असलेल्या जिल्ह्यांचा अनुशेष संपुष्टात आणण्याच्या प्रयोजनार्थ" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

सन १९९७ चा विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम हा विदर्भातील जलसिंचन अनुशेष दूर करणे या उद्देशाने तयार करण्यात आलेला आहे. परंतु उक्त अधिनियमात तशा कोणत्याही तरतुदी आढळून येत नाहीत. अधिनियमातील सद्यः तरतुदींमुळे अनुशेष दूर होण्याची शक्यता दिसत नाही. राज्यातील इतर भागाच्या मानाने विदर्भात जलसिंचन या विकास क्षेत्रात तुलनेने जास्त अनुशेष असल्याने हा अनुशेष आणखी वाढू नये म्हणून या अधिनियमात सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २६ मे, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव -१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.